संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय....

॥ न मे भक्त : प्रणश्यति ॥

# पाकला नीट करण्यासाठी धीट होणे हाच पर्याय

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या सहा देशांचा दौरा करताना पाकिस्तानचे पंतप्रधान नवाज शेरीफ यांची देखील भेट घेतली.दोन्ही देशांच्या पंतप्रधानांनी तिसऱ्याच ठिकाणी झालेली गाठभेट म्हणजे केवळ एक उपचार म्हणायला हवा.कारण हे दोघेही रशियामध्ये पाहुणे म्हणूनच गेले होते.त्यांना आपापसातील कलगीतुरा करण्याची ही काही योग्य जागा नव्हतीच. परंतु काही महत्त्वाच्या प्रश्नांवर आपली स्पष्ट भूमिका मांडता आली असती. पाकिस्तानचा भारतविरोधी पवित्रा कोणत्याच बाबतीत कमी झालेला नाही.परराष्ट्रीयस्तरावर किंवा राजकीय पातळीवर या दोन्ही देशांच्या पंतप्रधानांमध्ये किंवा मंत्रीअधिकाऱ्यांमध्ये ज्या काही चर्चेच्या फेऱ्या होतात. त्या यापुढे अशाच चालू राहतील.पाकिस्तानच्या वागण्याबोलण्यात कोणताही आश्चर्यकारक बदल होण्याची सुतराम शक्यता नाही.कारण एकूणच तिथली राजकीय आणि सामाजिक स्थिती विचित्र स्वरूपाची आहे. ज्या देशामध्ये लोकशाही नावाचा प्रकार शिल्लक नाही धार्मिक आधारावर पूर्णपणे तिथला राज्य कारभार चालतो.निवडून येण्यापुरता मतदानाचा आधार घेतला म्हणजे काही तो देश लोकशाहीवादी ठरत नाही. पैशाच्या जोरावर आणि त्याहीप्रमाणात बदललेल्या जनमानसाचा आधार घेऊन पाकिस्तानात सत्तापरिवर्तन होत राहते. तरीदेखील आजही इथले लष्कर हे सुप्रीम पॉवर असल्यासारखे आहे.तर दहशतवादी संघटना या रिमोट कंट्रोलसारख्या काम करत असतात. भारताबाबत पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी कुठली भूमिका घ्यावी हे ठरवण्याचे काम इथले धर्मांध नेते आणि दहशतवादी करीत असतात. त्यापैकी कोणाचाच रोष ओढवून घेणे पाकिस्तानच्या पंतप्रधानाला परवडत नाही.अशा वातावरणात नवाज शरीफ आणि नरेंद्र मोदी यांच्यात ज्या काही चर्चा झाल्या असतील.तो केवळ एक सरकारी शिष्टाचार ठरतो. त्यामधून भारताला कोणताही मोठा लाभ होण्याची शक्यता नाही. पाकिस्तानने आपल्याशी नीट वागावे. म्हणून भारताने वेगवेगळ्या पध्दतीने लोटांगण घालावे लागेल. हा प्रकार आतापर्यंत होत राहिला. अनेक प्रकारचे मैत्रीकरार झाले. शांतता सलोख्यासाठी निरनिराळे प्रयोग झाले. परंतु कशाचाही उपयोग होत नाही. अशावेळी पाकिस्तानच्या व्यवहारात सुधारणा होतील. आणि भारताची डोकेदुखी कमी होईल अशा संभ्रमात जर कोणी वावरत असेल तर तो मुत्सद्देगिरीतलासुध्दा मूर्खपणा ठरू शकतो. आतादेखील २६/११ च्या हल्ल्यातील आरोपींवर खटला चालवण्यासाठी पाकिस्तानचे सहकार्य मागितले गेले.आणि ते देऊ असे आश्वासन शरीफांनी दिले.या दोन्ही गोष्टी इतक्या बाळबोध स्वरूपाच्या आहेत.याबाबत कोणतीच प्रगती होणार नाही.हे दोघांनाही माहिती आहे.अन्यथा गेल्या सात वर्षांमध्ये या खटल्याचा निकाल लागून संबंधितांना फासावरसुध्दा लटकवले गेले असते.

## दहशतवादी प्रतिमेचे मोठे भांडवल

जगाच्या पाठीवर भारत पाकिस्तान हे असे दोन देश आहेत की, ज्यांच्यामध्ये अगदी शेजारधर्म निर्माण झाला तरी तो भारताला एकतर्फी पाळण्याचे बंधन येते. आणखी एका बाबतीमध्ये हे दोन देश म्हणजे वेगळे उदाहरण ठरते. जगाच्या पाठीवर असे अनेक देश असतील की ज्यांच्या उक्तीपेक्षा, कृतीला महत्त्व दिले जाते. अनेक वेळेला तर आपापसात कोणतेही करारमदार न होता आपापसातील संबंध मैत्रीपूर्ण ठेवले जातात. परंतु पाकिस्तानबाबत मैत्रीला निभावून नेण्याऐवजी त्या मैत्रीला कात्री लावण्याचाच उद्योग केला जातो. आणि म्हणून पाकिस्तानबरोबर भारताने कितीही चर्चेच्या फेऱ्या केल्या तरी त्याची फक्त सुरुवात होत राहते. त्याचा शेवट कधीही येत नाही. जोपर्यंत कुठल्याही एका मुद्यावरचा व्यवस्थितपणे शेवट होत नाही.तोपर्यंत पाकिस्तानच्या वागण्याबोलण्यामध्ये फरक पडू शकत नाही.आतापर्यंत या देशाशी अधिकाधिक सलोख्याने वागण्याचा भारताने प्रयत्न केला.पण पाकिस्तानने नेहमीच सूडाने वागण्यातच धन्यता मानली.अशा परिस्थितीत कोणालाही असे वाटू लागते की मग भारताने नेमके काय केले पाहिजे.त्यावरचे एकमेव उत्तर म्हणजे या ज्या काही औपचारिकपणे किंवा शिष्टाचार म्हणून चर्चा किंवा गाठीभेटी होत राहतात. त्या भारताने चालू ठेवाव्यात.परंतु पाकिस्तानला नीट करण्यासाठी भारताने अधिकाधिक धीट व्हावे. हेच त्यावरचे प्रमुख उत्तर ठरते.आणि आपण धीट झालेलो आहोत हे पाकिस्तानच्या लक्षात आणून देण्याचे वेगवेगळे मार्ग अवलंबले पाहिजेत.जगातल्या सगळ्या देशांना पाकिस्तान ही काय चीज आहे माहीत झाले आहे.ते दहशतवाद्यांचे आश्रयस्थान आणि दहशतवादाचे उगमस्थान आहे हे सर्वांना कळून चुकले आहे.अशावेळी या परिस्थितीचा भारताने लाभ घेऊन या एका मुद्यावर पाकिस्तानची सतत कोंडी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताला सहजपणे समर्थन प्राप्त होत जाईल.ही गोष्टसुध्दा भारताच्या धीटपणाला उपयोगी ठरू शकते.

## काश्मिरातल्या बांडगुळांना ठेचा

दुसरा आणि सर्वात महत्त्वाचा उपाय म्हणजे या एकाच कारणावरून पाकिस्तान भारताच्या नावाने सतत बांग देत असतो. त्या काश्मीरच्या मुद्यावरसुध्दा त्याला रोखता येऊ शकते. गेल्या अनेक वर्षांपासून काश्मिरचा मुद्दा घेऊन पाकिस्तानने आपले अस्तित्व शाबूत ठेवले आणि आता तर भारतातल्या राजकीय परिस्थितीत काही फुटीरतावाद्यांना हाताशी धरून थेट ढवळाढवळ करण्याचा उद्योग चालू केला आहे. काश्मीरात पाकिस्तानचे झेंडे मिरवले जाणे, इथल्या ठराविक फुटीरतावाद्यांना पाकिस्तानने स्वातंत्र्यवीर म्हणणे ही सगळी परिस्थिती केवळ भारताच्या नरमाईच्या जोरावर निर्माण झाली.जर भारताकडे अमेरिकेसारखे धैर्य नसेल पाकव्याप्त काश्मिरमध्ये घुसून भारतविरोधी कारवाया उखडून लावणे शक्य नसेल तर मग निदान प्रत्यक्ष काश्मीरमध्ये असणाऱ्या फुटीरतावाद्यांना कायमचा धडा शिकवणे तिथला दहशतवाद अत्यंत क्रूरपणे किंवा निर्दयीपणे ठेचून काढणे हे उपाय तर सहजपणे करता येऊ शकतात.या कारवाया करण्याचा धीटपणा भारताने दाखवला तरी पाकिस्तानात भारतविरोधी बांग देणाऱ्या बांडगुळांना परस्पर तडाखे बसू शकतात.बाकी मग चर्चेची कबुतरे कितीही उडत राहिली तरी त्याची दखल घेण्याची गरज उरणार नाही. पाकिस्तानला नीट करण्यासाठी भारताने धीट होणे गरजेचे ठरते.